दैनिक
अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक १४८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२२ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


## वनजीवांच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाययोजना निष्फळ; महामार्गावर प्राण्यांचे वारंवार अपघात

# कर्नाळा पक्षी अभयारण्यातील प्राणी असुरक्षितच

## महामार्गावर गाडी थांबवून माकडांना खाद्यपदार्थ टाकण्याचे प्रकार; वनविभागाकडून कारवाई नाहीच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्याच्या आसपासचा भूभाग पक्ष्यांच्या वैविध्यतेसाठी प्रसिद्ध आहे. हा परिसर कर्नाळा अभयारण्य म्हणून संरक्षित आहे. परंतु कर्नाळा पक्षी अभयारण्य परिसरात प्राणी सुरक्षित नसल्याची बाब पुन्हा एकदा समोर आली आहे. अभयारण्यातील प्राण्यांच्या सुरक्षेसाठी करोडो रुपये खर्च करून मुंबई-गोवा महामार्गावर प्राणी येणार नाहीत यासाठी महामार्गाच्या दुतर्फा प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. परंतु या उपाययोजना तांत्रिकदृष्ट्या फोल ठरल्याने पुन्हा एकदा मुंबई-गोवा महामार्गावर अपघातात मुक्या प्राण्यांचा जीव जात आहे.**



धारण पावणे बाराच्या दरम्यान अभयारण्य परिसरात एका अज्ञात वाहनाने माकडाला धडक देऊन तिथून निघून गेला. या धडकेत माकड गंभीररित्या जखमी होऊन रस्त्याच्या मधोमध पडून होते. याच दरम्यान पनवेलकडून पेणच्या दिशेने येत असलेले सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी पाहिल्यानंतर थांबून माकडाला रस्त्याच्या कडेला नेले आणि वन अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतू संपर्क न होऊ शकल्याने शेवटी कर्नाळा अभयारण्याच्या कार्यालयात गेले असता वन परिक्षेत्र अधिकारी उपलब्ध नसल्याचे समजले. त्यानंतर तेथे उपलब्ध असलेले वन रक्षक राठोड यांना तात्काळ जखमी माकडावर उपचार करण्याची विनंती केली असता सदर जखमी माकडाला पकडण्यासाठीचे साहित्य नसल्याचे सांगितल्याने कर्नाळा अभयारण्यातच प्राणी सुरक्षित नसल्याचे स्पष्ट होत आहे.

अभयारण्याच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करून अटी आणि शर्ती ठरवण्यात आल्या आहेत.



त्यामध्ये अभरण्यामधून जाणाऱ्या महामार्गाभोवती ध्वनीरोधक लावण्याबरोबरच वानर आणि माकडांना महामार्ग ओलांडण्यासाठी पूल बांधण्यात आला आहे. महामार्गावरील वाहनांची वर्दळ लक्षात घेता अभयारण्यातील माकडांना महामार्ग ओलांडून पलीकडे जातांना अपघात होऊ नये म्हणून 'मंकी लॅडर' बांधण्यात आला आहे. माकडांनी देखील या लॅडरचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. या पुलावरून माकडांना रस्त्याच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूस जाण्यासाठी व सुरक्षितरित्या रस्ता ओलांडण्यासाठी महामार्गाच्या दोन्ही बाजूला असलेल्या झाडांना मंकी लॅडरच्या साहाय्याने जोडले आहे. तसेच महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी माकडांना खाऊ न घालण्याचे आवाहन केले असतानाही काही बेशिस्त नागरिक प्राणिप्रेमाचा आव आणतात आणि रस्तातच गाडी उभी करून माकडांना खाद्यपदार्थ खाऊ घालतात. यामुळे अनेकदा माकडे रस्त्यावर आल्याने त्यांचे अपघात घडून इजा होते तर अनेकदा माकडाचे प्राणही जातात. त्यामुळे अश्या नागरिकांवर वनविभागाने कारवाई करण्याची मागणी केली जात आहे जेणेकरून अपघातांचे प्रसंग घडणार नाहीत व वन्यजीव सुरक्षित राहतील.

> वनविभागाने महामार्गावर जे प्रवासी प्राण्यांसाठी खाद्यपदार्थ टाकतात त्यांच्यावर कारवाई करण्याची वारंवार मागणी होत असतानाही कर्नाळा अभयारण्य वनपरिक्षेत्र अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळेच अभयारण्यातील प्राण्यांना आपला जीव गमवावा लागत आहे.
> **- संतोष ठाकूर (सामाजिक कार्यकर्ते)**

> माकडांना महामार्गावर रस्ता ओलांडण्यासाठी मंकी लॅडर ही नवी संकल्पना अंमलात आणली आहे. यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होणार आहे. माकडे रस्त्यावर येऊ नये यासाठी नॉईज बॅरीअरची उंचीही वाढवली आहे परंतु झाडी वाढलेली असल्याने त्यावरून माकडे ये-जा करीत असतात. महामार्गावर वन्यप्राण्यांच्या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नुकतीच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात आली. अभयारण्य परिसरात भरधाव वाहनांमुळे अनेकदा वन्यप्राण्यांचे अपघात घडतात यासाठी गतिरोधक बसवले जाणार आहेत. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत वन्यप्राण्यांना खायला घालणे हा गुन्हा आहे. त्यानुसार कर्नाळा अभयारण्य परिसरात महामार्गावर सूचना फलक लावले जाणार आहेत. त्याचप्रमाणे वन्यप्राण्यांना खायला घालणाऱ्या नागरिकांवर देखील गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
> **- नंदकिशोर कुप्ते (सहाय्यक वनसंरक्षक, कर्नाळा अभयारण्य)**

## संक्षिप्त...

### तर कदाचित लॉकडाऊन लावावा लागेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील ऑक्सिजन साठ्यात फार काही विशेष वाढ झालेली नाही. राज्यात कोविड रुग्णांसाठी ७०० मेट्रिक टनांपर्यंत ऑक्सिजन जेव्हा लागेल तेव्हा कदाचित आपल्याला राज्यात लॉकडाऊन लावावा लागेल, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुंबईतील खास बाल कोविड काळजी केंद्राचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन आज उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

उद्धव ठाकरे यांनी म्हटलं की, आज जनतेच्या सेवेसाठी दोन आरोग्यसेवेचे लोकार्पण झालं आहे. तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली जात आहे. इतर देशात, राज्यात लहान मुलांमध्ये कोरोना संसर्ग वाढलेला आहे. आपल्याकडे हा संसर्ग वाढणार नाही, तरी आपण तयारी सर्व गोष्टींची ठेवत आहोत, असं ते म्हणाले. ते म्हणाले की, त्याच अनुषंगाने लहान मुलांना कोविडची लागण झाली तर त्यांना रुग्णलयाचा भयावह वातावरण न वाटता चांगल्या वातावरण तयार करण्यासाठी हे सेंटर उभारले आहेत.

## मोर्बामध्ये उसने पैशाच्या वादातून हल्ला

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

तालुक्यातील मोर्बा विभागात उसने पैसे देवाणघेवाणीच्या वादातून दि. २० ऑगस्ट रोजी चाकूने सपासप वार करून जीवे ठार मारण्याची घटना घडली असून माणगांव पोलिसांनी आरोपीला जेरबंद केले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तरवृत्त असे की, फिर्यादी व जखमी अब्दुल वाहाब युसूफ वाहाब, वय ६३ वर्षे, व्यवसाय मच्छि विक्री यांनी आरोपी सिराज चांद मोहम्मद अन्सारी रा. दहिवली रोड मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड यास ५०००/- रु. उसने दिले होते. दि. १९ ऑगस्ट रोजी आरोपी यांने फिर्यादीला ५००/- रु. परत दिले. आरोपीने परत फिर्यादी यांच्याकडे पैशाची मागणी केली असता फिर्यादी यांनी मागील ४५००/- रु. परत दे असे म्हणले असता त्याचा राग येऊन आरोपीने फिर्यादी यांच्या घराच्या दरवाजाला आतून कडी लावून बंद करून फिर्यादीला बेडरूममध्ये ओढत नेऊन आरोपीने चाकूने फिर्यादी यांच्या मानेवर, डोक्याच्या मागे, कपाळावर, उजव्या गालावर, उजव्या हाताच्या मनगटावर सपासप वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

याबाबत माणगांव पोलीस ठाणे येथे कॉ. गु. र. नं. १८९/२०२१ भा. दं. वि. सं. क. ३०७, ४५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास स. पो. नि. कावळे करीत आहेत.

## पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांसाठी आशेचा किरण

### नवीन कायद्यानुसार पाच लाखा पर्यंतच्या ठेवी मिळणार परत




**दै.रायगड नगरी । पेण**

संचालक मंडळाने केलेल्या आर्थिक गैरव्यवहार मुळे बुडीत गेलेल्या पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना आशेचा किरण दिसला आहे. ठेव हमी कायद्यात केलेल्या बदलाचा फायदा पेण अर्बनच्या लाखो ठेवीदारांना होणार असून पाच लाखापर्यंत ठेव असलेल्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळणार आहेत.

संचालक मंडळाने केलेल्या आर्थिक घोटाळ्यामुळे रिझर्व्ह बँकेने दहा वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेने पेण अर्बन बँकेवर आर्थिक निर्बंध लादले आहेत. यामुळे बँकेतील सुमारे एक लाख ९८ हजार ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या ठेवी बँकेत अडकून पडल्या.

ठेव हमी योजनेतील कायद्यानुसार फक्त एक लाखापर्यंत ठेवी व त्यावरील व्याज याना संरक्षण होते आता या कायद्यात बदल करून हे रक्कमेवरील संरक्षण हे पाच लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

पंजाब अँड महाराष्ट्र को ऑपरेटिव्ह बँक मागील वर्षी दिवाळखोरीत निघाल्यावर डिपॉझिट इन्शुरन्स वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार डिपॉझिट इन्शुरन्स आणि क्रेडीट कॉर्पोरेशन कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे. त्या नुसार बँकेच्या ग्राहकांना मुळ रक्कम व व्याज मिळुन पाच लाखांच्या रकमेपर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे. आता पर्यंत केवळ एक लाख रुपयांपर्यंत ठेवींना संरक्षण होते. त्यामुळे बुडीत बँकेच्या ठेवीदारांना एक लाखाच्या वरील रक्कमेवर जवळजवळ पाणी सोडावे लागत होते.

आता केंद्र सरकारने कायद्यात बदल केल्याने या ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. ज्या बँकांवर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत त्या दिवसापासून नव्वद दिवसांच्या आत ही रक्कम अदा करावी लागणार असल्याचे या कायद्यात म्हटले आहे.

केंद्र शासनाच्या या नवीन कायद्याचा फायदा पेण अर्बन बँकेच्या खातेदारांना होणार आहे. पेण अर्बन बँकेच्या एक लाख ९८ हजार ठेवीदारां पैकी जवळपास एक लाख ९५ हजार ठेवीदारांना त्यांच्या पाच लाख रुपयांच्या पर्यंतच्या ठेवी यामुळे परत मिळणार आहेत. ही रक्कम जवळपास पाचशे कोटी रुपयांपर्यंत असणार आहे. केंद्र शासनाच्या या नवीन कायद्यामुळे पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

> केंद्र शासनाने डिपॉझिट इन्शुरन्स कायद्यात केलेला बदल हा निश्चितच स्वागतार्ह आहे. या कायद्यामुळे पाच लाख रुपयांच्या ठेवीना विमा संरक्षण मिळणार आहे.या कायद्याचा फायदा पेण अर्बन बँकेच्या एकूण ठेवीदारां पैकी ९९ टक्के ठेवीदारांना मिळणार आहे.
> **- नरेन जाधव, कार्याध्यक्ष, पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समिती**

## पनवेल प्रांताधिकारीपदी राहूल मुंडके

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या प्रांत अधिकारी पदी राहुल मुंडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे.

यापूर्वी राहुल मुंडके हे बोरिवली, मुंबई येथे मुद्रांक जिल्हाधिकारी होते. दत्तात्रेय नवले यांची मेट्रो सेंटर येथे बदली झाल्याने त्यांच्या जागी राहुल मुंडके नवे प्रांत अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.

## संजय भोये नवे गटविकास अधिकारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी (बिडीओ) पदी संजय भोये यानी पदभार स्वीकारला आहे.

भोये यापूर्वी खालापुर पंचायत समिति येथे गट विकास अधिकारी होते. अनेकानी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## सिडकोच्या भूखंड विक्री योजनांतील अर्जदारांसाठी सिडकोने उचलली दिलासादायक पाऊले

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

**सिडको महामंडळाने, भूखंड विक्री योजनांतील भूखंडांना जिओ टॅगिंग करण्यास सुरू केले असून यामुळे अर्जदारांना आपल्या पसंतीच्या भूखंडाचे निश्चित स्थान कळणे अधिक सुलभ होणार आहे. याचबरोबर विहित केलेल्या मुदतीत अर्जदार जर पहिला व दुसरा हप्ता भरू शकले नाहीत तर यथायोग्य प्रकरणामध्ये** (Deserving Cases) **अशा अर्जदारांना हप्ता भरण्यासाठी मुदत वाढवून देण्याचा सकारात्मक निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे.**




सिडकोकडून निवासी तथा निवासी व वाणिज्यिक भूखंडांची विविध योजनांद्वारे सातत्याने विक्री करण्यात येते. सदर योजनांतील भूखंडांचे आता सीमांकन करून त्याला कुंपण घातले जाणार आहे. त्याचप्रमाणे सदर भूखंडाचा तपशील दर्शविणारा फलक प्रत्येक भूखंडावर लावला जाणार आहे. सदर फलकावर भूखंड क्रमांक, सेक्टर, नोड व भूखंडाचे क्षेत्र, बारकोड डिस्प्ले या बाबींचा समावेश असणार आहे. यामुळे आता भूखंडधारकांना आपल्या पसंतीच्या भूखंडाचे निश्चित स्थान व सीमा कळण्यास मदत होणार आहे.

याचबरोबर सिडको नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित) .../४

## उरण महाविकास आघाडीची नपा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिकेची निवडणूक काही महिन्यावर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सत्ताधारी भाजपाला विरोधात उरण महाविकास आघाडीने मोर्चेबांधणी करण्याच्या दृष्टीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उरण नगरपालिकेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल व आगामी सर्व निवडणुका महाविकास आघाडी एकत्रित लढेल असा विश्वास आघाडीचे प्रवक्ते जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी व्यक्त केला.



यावेळी महाविकास आघाडीतर्फे शेकापचे आमदार बाळाराम पाटील, शिवसेनेकडून जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर, राष्ट्रवादीकडून प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, भावना घाणेकर, आंनद भिंगार्डे, उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, तालुका प्रमुख संतोष ठाकूर, महादेव घरत, गटनेते गणेश शिंदे, शेकापकडून तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल, काका पाटील, काँग्रेसकडून जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, तालुका अध्यक्ष जे. डी. जोशी, शहर अध्यक्ष किरीट पाटील, अकलाख शिलोत्री, नगरसेवक अतुल ठाकूर, समीर मुकरी व आघाडीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

उरण नगरपालिकेत भाजपाची एकहाती सत्ता आहे. नगरपालिकेची मुदत काही महिन्यात संपणार आहे. त्यामुळे भाजपाला सत्तेवरून पायउतार करण्यासाठी उरणमध्ये महाविकास आघाडीची मोट बांधण्यात आली आहे. नगरपालिका निवडणुकीसाठी रणनीती ठरविण्यासाठी उरण महाविकास आघाडीतर्फे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. .../४

# उन्मादाचे उत्खनन

उन्मादाचे उत्खननगेली पन्नासहून अधिक वर्षे पश्चिम बंगाल आणि निवडणूक हिंसाचार हे समीकरणच झाले आहे. बंगालने देशाला बऱ्याच चांगल्या गोष्टी दिल्या. दुर्दैवाने, प्रचारकाळात, मतदान चालू असताना आणि नंतरही किती भयंकर हिंसाचार होऊ शकतो, याची उदाहरणेही बंगालनेच घालून दिली. बिहारमध्ये निकालांनंतर हिंसा होते, तेव्हा त्याचे अनेकांना नवल वाटत नाही; मात्र 'सुसंस्कृत बंगाल'मध्ये खूनबाजी न होता एकही निवडणूक आजवर पार पडलेली नाही. नक्षलबारी या गावात नक्षलवादी चळवळीची सुरुवात, काँग्रेसकडून डाव्यांनी सत्ता खेचणे आणि त्यानंतर डाव्यांना त्याच भाषेत रक्तरंजित उत्तर देणारा ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष, अशी ही हिंसाचाराची चढती भाजणी आहे. भारतीय जनता पक्षही याबाबत तृणमूलपेक्षा कमी नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला ऐतिहासिक विजय मिळाल्यानंतर, जिल्ह्याजिल्ह्यांत जो भयंकर नंगानाच झाला, त्याने कोलकाता उच्च न्यायालयही किती अस्वस्थ झाले आहे, हे ताज्या निकालातून स्पष्ट होते. पाच जणांच्या खंडपीठातील न्यायमूर्तींनी वेगवेगळी निकालपत्रे दिली असली, तरी सर्वांनी एकमताने केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाकडून निकालोत्तर हिंसाचाराची चौकशी करावी, असा स्पष्ट आदेश दिला आहे. या निकालाचे स्वागत करायला हवे. हा निकाल आल्यानंतर एकीकडे सीबीआयने तातडीने चार तपास पथकांची स्थापना केली, तर बंगाल सरकारने निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचे ठरविले. तेथे जो काही निकाल लागायचा असेल तो लागेल; मात्र मनमुराद हिंसाचार करून निवडणुकीतील विजय साजरा करायचा, ही बंगालमधील संस्कृती बदलण्याची गरज आहे. सीबीआयच्या तपासामुळे कदाचित ही प्रक्रिया सुरू होऊ शकते. कोलकाता उच्च न्यायालयात सात याचिका दाखल झाल्या होत्या. यातल्या, निरपराध महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या कहाण्या धक्कादायक आणि संतापजनक आहेत. एक महिला राज्याचे नेतृत्व करीत असताना महिलांच्या वाट्याला इतके अत्याचार यावेत, हा देशाची मान लाजेने खाली जावी, असा प्रकार आहे. याहूनही वाईट म्हणजे, विजयाच्या उन्मादात तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते हिंसाचार करीत होते, तेव्हा खुद्द ममता बॅनर्जी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कठोरपणे ही हिंसा थांबविण्याची गरज होती. तसे झाले नाही. ते का झाले नाही आणि हिंसा करणाऱ्या जमावांना कोणी पाठिशी घालत होते का, हे सीबीआय तपासात स्पष्ट होईल. सध्या केंद्र व बंगाल सरकार यांच्यात सातत्याने संघर्ष चालू असून, या निकालामुळे त्याला नवा आयाम मिळाला आहे. यासाठीच, सीबीआयने केवळ तृणमूल कार्यकर्त्यांच्या हिंसाचाराची दखल न घेता जिथे भाजपचे उमेदवार विजयी झाले, तेथे झालेल्या अत्याचारांचीही दखल घ्यावी. अशाही गुन्ह्यांचा तपास व्हायला हवा. कोलकाता उच्च न्यायालयाने तपासाचा आदेश देताना सीबीआयला पूर्ण मोकळीक दिलेली नाही, याचेही स्वागत करायला हवे. सीबीआय ही केंद्र सरकारच्या सोयीने काम करते, हा एरवीचा अनुभव आहे. तसे या प्रकरणात न्यायालयीन निगराणीमुळे होणार नाही. या तपास कामावर लक्ष ठेवताना, उच्च न्यायालयाने केवळ याचिकांमध्ये नमूद केलेल्या गुन्हे व अपराधांकडे लक्ष न देता, सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या विरोधात गंभीर गुन्हे दाखल झाले असतील, तर तेही विशेष तपास पथकाकडे वर्ग होतील, हे पाहावे. उच्च न्यायालयाने 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ला हिंसाचाराच्या साऱ्या तक्रारींची पडताळणी करण्यास सांगितले होते. आयोगाच्या या अहवालात केलेली अनावश्यक शेरेबाजी व शिफारसी दोन न्यायमूर्तींना आवडलेल्या नाहीत. मानवाधिकार आयोगाने जसे आपल्या मर्यादेत राहणे अपेक्षित होते; तसे निवडणूक आयोगानेही आपले काम नीट करायला हवे होते. बंगालमध्ये निवडणूक आयोगाची खरी पंचाईत एकीकडे केंद्र सरकार आणि दुसरीकडे, रोजच्या रोज संबंध येणारे राज्य सरकार यांच्या कात्रीत सापडल्याने झाली होती. तरीही, निकाल लागत असताना जो हिंसाचार उफाळला, त्याबाबत उच्च न्यायालयाने आयोगावर काहीसा ठपकाच ठेवला आहे. तोही योग्य आहे. जोवर निवडणूक प्रक्रिया पुरी होत नाही, तोवर सारी पोलिस व सुरक्षा दले आयोगाच्या अखत्यारीत असतात. त्यांचा योग्य तो वापर करून, निवडणूक आयोगाने जरब बसवायला हवी होती. प्रसंगी उमेदवारांवर कठोर कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला असतात; मात्र अलीकडे केंद्रीय निवडणूक आयोगही सुस्तावला असून, राजकीय पक्ष व नेत्यांच्या सोयीने वागतो आहे. आता ममता सरकारने निकालाला दिलेल्या आव्हानाची दखल सर्वोच्च न्यायालय कशी घेते, हे पाहावे लागेल. नेते विजयानंतर उग्र आणि उर्मट होतात; तेव्हा अनुयायी हातात थेट हत्यारे घेतात. बंगालमध्ये तसेच झाले. उच्च न्यायालयाच्या आदेशाने होणारे हे उन्मादाचे उत्खनन अनेक अर्थांनी आवश्यकच होते.

# मुळशी आणि मावळ तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या वतीने महाड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील महाड तालुक्यामध्ये दि.२२ जुलै रोजी झालेल्या महापूरात महाड शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक घरात चिखल साचला, अन्नधान्य वाहून गेले तर काही ठिकाणी भिजून खराब झाले, यात प्राथमिक शाळांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



या सर्व परिस्थितीत त्यांना मदतीचा हात देण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा मुळशी आणि मावळ तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या वतीने नुकतेच महाड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा रिपोर्टर ट्रस्टी कायदेशीर महासचिव व्ही. एस.मोखळे व महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील महाड परिसरातील पूरग्रस्तांना मदतीचा हात म्हणून तेथील लोकांशी संवाद साधून तिथे ज्या पद्धतीची गरज होती ती गरज ओळखून यांनी प्राथमिक शाळा खरवली, आकले, भावे, भोराव, कोंडीवते शाळा नंबर २, बिरवाडी या सर्व शाळांमधील सुमारे दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांना भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा, मुळशी आणि मावळ तालुका यामधील कार्यकर्त्यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी पुणे जिल्हा कोषाध्यक्ष प्रकाश निकाळजे, उपाध्यक्ष बी.आर.प्रक्षाळे, मुळशी तालुका अध्यक्ष अशोक निकाळजे, प्रमुख सल्लागार लहू चव्हाण, महासचिव विनोद ओव्हाळ, कोषाध्यक्ष माणिक भालेराव, प्रमुख समता सैनिक दल मुळशी विकास भालेराव, कोषाध्यक्ष पोपट चव्हाण, उपाध्यक्ष मुळशी उत्तम रोकडे, ग्रामपंचायत सरपंच भुकूम निलेश ननावरे, भाऊसाहेब वाकळे, भाऊसाहेब साळवे, राजेंद्र जाधव, सचिव मुळशी रोहित यादव, सरपंच दखणे महेश आल्हाट, करमोळी पोलीस पाटील योगेश निकाळजे, असदे सरपंच शारदा ताई ननावरे, सदस्य मुळशी अक्षय वीर, जयवंत भोसले, भाऊसाहेब कदम, उपाध्यक्ष सी.आर. ग्रुप पुणे शैलेंद्र रोकडे, उपाध्यक्ष मावळ तालुका सी.आर. ग्रुप राजाराम पारखी इ.मान्यवर उपस्थित होते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत शेठ थोरात, अशोक खोत, देवेंद्र पालीवाल यांनी विशेष सहकार्य केले. या सर्व उपक्रमाचे नियोजन व आयोजन भिमराव कांबळे,उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली व पुणे जिल्हा अध्यक्ष सुरेश नाना साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा आणि मुळशी तालुका मावळ तालुका यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी प्रस्तावना निमंत्रक अमर चौरे, अध्यक्ष मावळ व अध्यक्ष संस्कार प्रमुख पुणे जिल्हा यांनी केले. शालेय साहित्य मोफत वाटप प्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षक सर्वश्री सुनील खेरे, अनिल शिणके, संगिता साबळे, श्री.शिर्के, श्री.शेलार, श्री.सूर्यवंशी या शिक्षकांनी सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

### रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे दरडग्रस्त व पुरग्रस्त गावांचा तज्ज्ञांमार्फत अहवाल करून...

# राज्य व केंद्र सरकारचे लक्ष वेधणार : मेधा पाटकर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर आणि महाड तालुक्यातील ज्या गावांना अतिवृष्टीमुळे दरडग्रस्त व पुरग्रस्त होऊन आर्थिक नुकसान, पशूधन व जिवित हानी सोसावी लागली. या सर्व बाबतीत तज्ज्ञांमार्फत अहवाल करुन राज्य व केंद्र सरकारचे लक्ष वेधणार असल्याची ग्वाही जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय अध्यक्षा मेधा पाटकर यांनी दिली.



महाड तालुक्यातील तळिये गावात २२ जुलै रोजी झालेल्या भुस्खलनात दरडीखाली गाडलेल्या घरांची पाहणी करण्यासाठी नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय अध्यक्षा मेधा पाटकर यांनी भेट दिली. याप्रसंगी युसूफ मेहेरअली सेंटरच्या विजया चौहान व नितीन अणेराव, गुड्डी, मुंबई च्या सुनिती सुरव, राष्ट्रसेवा दल मुंबई सीरत सातपुते तसेच कार्यकर्ते विलास पिरोटे, इब्राहिम खान, मनीष देशपांडे, अस्लम बागवान, प्रशांत गावंड, अजय भोसले, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे रायगड अध्यक्ष शैलेश पालकर, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन दारूबंदी कार्यकर्ते अब्दुल हक खलफे, आदींनी एकाचवेळी बाधित कुटुंबातील लोकांना कशाप्रकारे मदत करता येईल, याबाबत आढावा घेतला.

रायगड जिल्ह्यातील तळिये दरडग्रस्त गावाच्या पाहणीनंतर मेधाताईंनी राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची भेट घेणार असल्याचे सांगितले. तातडीने शक्य झाल्यास केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एक सविस्तर पत्र लिहिणार असल्याचे यावेळी मेधा पाटकर यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर व महाड येथील पुरस्थिती व दरडप्रवण क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व पर्जन्यमान याबाबत सविस्तर तज्ज्ञ मंडळींकडून अहवाल तयार करून शासनाला सादर करण्यात येईल.

तळिये गावातील दरडग्रस्तांसाठी पुनर्वसन घरकुले बांधताना तीन गुंठे जमिनीवर तीनशे चौरस फुटांचे घरकुल बांधून देण्याची म्हाडाची भुमिका बाधित कुटुंबांना अमान्य असल्याने सामाजिक आणि शासन अनुदान यांच्या समन्वयातून किमान एक हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे घर उपलब्ध करून देण्याबाबत आग्रही असल्याचे मेधाताईंनी सांगितले.

महाड शहरातील पुरसमस्या आणि यादरम्यान रासायनिक प्रदूषण करण्यासाठी सज्ज असलेले कारखाने यासंदर्भात नाथाभाई व्यायामशाळेच्या इमारतीमध्ये प्राचार्य डॉ.समीर बुटाला, मिलींद टिपणीस, डॉ. राहुल वारंगे, पक्षीमित्र सागर मेस्त्री तसेच अन्य अभ्यासू व्यक्ती उपस्थित होत्या.

यावेळी मेधाताई पाटकर यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेत महाडच्या पुरप्रश्नी शासनाचे लक्ष वेधण्याचा नजिकच्या काळात बैठक घेऊन प्रयत्न करू असे सांगितले.

# राज्यातील आरोग्य विभाग सक्षम तरच आपण सर्व कार्यक्षम राहू : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील जिल्हा परिषद आरोग्य यंत्रणेचा राज्य शासनाचे वतीने रायगड जिल्ह्याचे पालक मंत्री ना.आदीती तटकरे यानी आज कोव्हीड योध्दे म्हणून सन्मान केला व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. यावेळी कुमारी तटकरे यानी राज्यातील आरोग्य विभाग सक्षम तरच आपण सर्व पातळीवरील म्हणजे प्रशासनातील विविध विभाग आणि लोकप्रतिनिधी, प्रेस यंत्रणा भविष्यात कार्यक्षम राहील असे अभिमाना ने सांगत आरोग्य कर्मचाऱ्यानी कोव्हीड कालावधीत वेळ पडल्यास आपल्या कौटुंबीक समस्यां कडे दुर्लक्ष करीत केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.



आरोग्य विभागा तील कर्मचा ऱ्यांचे सक्षम सहभागा मुळे मागील २ वर्षात कोव्हीड १९ च्या पहिल्या व दुसऱ्या लाटेवर राज्य शासनाने यशस्वी मात केली आता येणाऱ्या तिसऱ्या लाटे वरही यशस्वी मात करण्या साठी सर्व स्तरावरील मंडळी आभ्यास करीत आहेत यातही आरोग्य कर्मचाऱ्याचा सहभाग मोलाचा ठरणार आहे असे आभिमानाने सांगितले. यावेळी जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, सभापती छाया म्हात्रे, उप सभापती संदीप चाचले, प.स.सदस्य मधुकर गायकर, माजी सभापती उज्वला सावंत, नगराध्यक्ष जयश्री कापरे, हलदे, महिला अध्यक्षा रेश्मा काणसे, गण अध्यक्ष सतीश शिगवण, अनिल बसवत,किरण पालांडे, संजय कर्णिक, चंद्रकांत कापरे, संतोष नाना सावंत, तहसीलदार शरद गोसावी, अेपीआय उध्दव सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत गायकवाड,प्रा.आ. केंद्र म्हसळा च्या डॉ. प्रियांका देशमुख , डॉ.नेहा पाटील, प्रा.आ.केंद्र खामगाव डॉ.गीतांजली हंबीर, डॉ. प्राजक्ता पोटे प्रा. आ.केंद्र मेंदडी डॉ. विशाल भावसार, डॉ.पूजा डोंगरे, डॉ.चारुशीला गायकवाड व आरोग्य सेवक मंगेश चव्हाण, अरुण कोल्हे, सागर सायगावकर आरोग्य सेविका शितल भगत, दिपिका दिवेकर, ज्योती महाडीक,आरोग्य सहायक शैलेश लाखे, गणेश दाताळ आदी कर्मचाऱ्यांचा प्रातिनिधीक स्वरूपात प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजकानी पोलीस यंत्रणेचे अेपीआय उध्दव सुर्वे व प्रेस क्लबचे बाबू शिर्के यांचा सत्कार केला. सूत्र संचालन प्रा.आ. केंद्र म्हसळा येथील वैद्यकिय आधिकारी डॉ.नेहा पाटील यानी केले.

# कृष्णाजीराव अर्जुन केळुस्कर यांची जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कुणबी मराठा समाजाचे नेते कृष्णाजीराव अर्जुन केळुस्कर यांची जयंती सम्यक क्रांती विचार मंच या संस्थेच्या वतीने अत्यंत उत्साहात व वैचारिक प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना मंगेशभाऊ वाघमारे यांनी सांगितले की, सत्यशोधक विचारांचे असलेले कृष्णाजीराव अर्जून केळुस्कर यांच्या कार्याची दखल समाजाने घेतलेली नाही. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तत्थागत बुद्धांची ओळख पहिल्यांदा केळुस्कर गुरुजी यांनी करून दिली.

केळुस्कर गुरुजी यांनी जसे शिवचरित्र लिहिले तसेच बुद्धचरीत्रही लिहिले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खऱ्या अर्थाने बालपणातच तथागत गौतम बुद्धांची ओळख करून देऊन या देशावर फार मोठे उपकार केळुस्कर गुरुजी यांनी केलेले आहेत. केळुस्कर गुरुजी यांची जयंती खऱ्या अर्थाने मोठ्या उत्साहात बहुजन समाजाने साजरी केली पाहिजे. पण बहुजन समाज ह्या कडे दुर्लक्ष करताना दिसत आहे.

या कार्यक्रमाला सुधागड तालुका मराठा समाजाचे सचिव जीवन साजेकर, सामाजिक कार्यकर्ते नितीन देसाई, राकेश साजेकर, नंदकुमार कुडपाने, माणगाव बु. ग्रामपंचायतीचे माजी उपसपंच विलास पालवे, महाराष्ट्र क्रांती संघटनेचे सुधागड तालुका अध्यक्ष संतोष बोडेकर, बाळा देशमुख, अजित शिंदे, योगेश नेमाने, सुरेश मोरे, योगेश मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोने उचलली दिलासादायक पाऊले

अधिनियम २००८ मधील तरतुदींच्या अधीन राहून भूखंडांची विक्री करते. सिडकोच्या भूखंड विक्री योजनेतील भूखंड शुल्काचा पहिला हफ्ता भरण्याची मुदत संपल्यानंतर यथायोग्य प्रकरणी (ॐशीर्शीळपस उरीशी) अर्जदाराला सदर हफ्ता भरण्यासाठी ३ महिन्यांपर्यंत तर दुसरा हप्ता भरण्यासाठी १० महिन्यांपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णयदेखील सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. पात्र प्रकरणांमध्येच अर्जदाराला लागू असलेल्या विलंब शुल्कासहीत ही मुदतवाढ देण्यात येणार आहे. सदर मुदतवाढीनंतरही अर्जदार हफ्ते भरण्यास असमर्थ ठरल्यास अर्जदारांना वाटपित केलेला भूखंड नियमानुसार रद्द होईल, अशी उपरोक्त अधिनियमात तरतूद आहे. उपरोक्त निर्णयांमुळे निश्चितच सिडकोच्या विविध भूखंडांच्या योजनेत सहभागी होणाऱ्या अर्जदारांना दिलासा मिळणार आहे.

## उरण महाविकास आघाडीची नपा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी

या पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी नगरपालिकेतील सत्ताधारी भाजपाने मनमानी कारभार करीत जतनेला वेठीस धरण्याचे काम केले आहे. शहरात वाहतूक कोंडी, रस्त्यांची अपूर्ण कामे, विजेचा लपंडाव, पाणी टंचाई, टाऊन हॉल, नगरपालिका कार्यालय, बायपास रस्ता, सभागृह आदींचे मोठ्या थाटामाटात भूमिपूजन केले होते. परंतु सदर कामे ५ वर्ष पूर्ण होण्यास येऊनही कोणतेही काम पूर्ण झाले नाही. उलट विकास कामांच्या नावाने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार मात्र करण्यात भाजपा आघाडीवर असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी केला. उरण शहरात विकासाची गंगा आणण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन या पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधत केला रक्षाबंधन साजरा



**दै.रायगड नगरी । उरण**

अनुभवातून शिकूया विज्ञानाचे धडे या उपक्रमा अंतर्गत भारतीय सण - संस्कृतीची विज्ञानाशी असणारी सांगड अधोरेखित करण्याकरिता उरण तालुक्यातील सारडे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील नाविन्यपूर्ण शिक्षणाची ज्ञानगंगा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगणात पोहचविणारे मुख्यध्यपिका उर्मिला गावंड मॅडम, उपक्रमशील शिक्षक कौशिक ठाकूर,समृद्धी वऱ्हाडी , सुनिल नऱ्हे या सर्व शिक्षक वर्गाच्या संकल्पनेतून आणि विद्यार्थी वर्गाच्या सहभागातून आज एका अनोख्या संकल्पनेला सत्यात उतरवले आहे.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारडे उरण येथील शाळेतील शिक्षकवर्गाच्या पर्यावरण पूरक व नाविन्यपूर्ण संकल्पनेला मुहूर्त रूप देतं विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारातील झाडांना राखी बांधत पर्यावरणाप्रती जागरूकता आणि निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त केली. हे परमेश्वरा ,ह्या रोपट्याचे रक्षण करण्यासाठी तू साहाय्य कर ! ह्याच उदात्त भावनेतून शालेय शिक्षणा सोबतच निसर्गाप्रति आस्था व व्यावहारिक आणि सामाजिक ज्ञानाची शिदोरी ह्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता कामी यावी म्हणून सदैव नवंनवीनं अभिनव संकल्पना आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारी शाळा म्हणून जिचं नावं रायगड मध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलं आहे. अशी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारडे ता. उरण या शाळेतील शिक्षकवर्गाने आणि विद्यार्थ्यांनीं साकारलेल्या एका आगळ्या वेगळ्या पर्यावरण पूरक संकल्पनेचं आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचं सर्व स्तरातून आणि मुख्यत्वे निसर्गप्रेमींकडून कौतुक होत जात आहे.

# तळोजा येथून रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील हिंडाल्को कंपनीच्या गेटसमोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली १ लाख ३० हजारांची ऑटो रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरल्याची घटना घडली आहे. योगेश फडके यांनी त्यांची एमएच ४६ बीडी ६७१५ हि रिक्षा त्याठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरून नेली आहे.

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

फौ.चौकशी अर्ज नं.११०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०९/२०२१

श्रीमती.पुष्पा नारायण घरत (विवाहानंतरची)
उर्फ पुष्पा मोरेश्वर भोईर (विवाहापूर्वीची)
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
घर क्र.६०, मु.पो.घारापूरी,
ता.उरण, जि.रायगड ४००००१ — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत जसखार
कार्यालयीन पत्ता : मु.जसखार
ता.उरण, जिल्हा : रायगड ४००७०७ — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती.पुष्पा नारायण घरत (विवाहानंतरची) उर्फ पुष्पा मोरेश्वर भोईर (विवाहापूर्वीची) यांचा जन्म दि.०१ माहे जून सन १९६९ रोजी किंवा त्या सुमारास त्यांच्या माहेरी राहत्या घरी मौजे : घारापूरी, ता.उरण, जि.रायगड येथे झाला आहे. म्हणून अर्जदार स्वतः हिने या जन्माच्या तारखेची नोंद होणेकामी उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जदार श्रीमती.पुष्पा नारायण घरत (विवाहानंतरची) उर्फ पुष्पा मोरेश्वर भोईर (विवाहापूर्वीची) हिचा वर नमूद ठिकाणी जन्म झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्याायलयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू अर्जदार यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२०/०८/२०२१ रोजी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| फौ.न्याया.उरण | | फौ.न्याया.उरण |

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# आपत्तीशी जिल्हा प्रशासनाची यशस्वी झुंज!

दिनांक २१ व २२ जुलै २०२१ रोजी रायगड, रत्नागिरी, कोकणपट्ट्यातील अतिवृष्टीमुळे दि.२२ जुलै २०२१ च्या रात्री महाड शहरात पूर आला तर त्या मागोमाग पोलादपूर तालुक्यातील देवनाळे व साखर सुतारवाडी तर महाडमधील तळीये या गावी दरड कोसळण्याच्या दुर्घटना घडल्या. सर्वांसाठीच हे अनाकलनीय होते.

गेल्या दीड-दोन वर्षापासून निसर्ग चक्रीवादळ, महाड येथील तारीक गार्डन पाच मजली इमारत दुर्घटना, तौक्ते चक्रीवादळ, अतिवृष्टी आणि आता अतिवृष्टीमुळे पूर, दरड कोसळणे अशा विविध संकटांशी रायगड जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी निधी चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे या प्रशासकीय प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली मुकाबला करीत आहे.

दि.२२ जुलै २०२१ हा दिवसही एक नवीन संकट घेवून आला. महाड येथील संततधार पाऊस व महाबळेश्वर येथील अतिमुसळधार पावसामुळे सावित्री नदीने दि.२२ जुलै २०२१ रोजी सर्वात जास्त १०.९० मी. पेक्षा अधिकची पाणी पातळी गाठल्याने महाड शहर, बिरवाडी, राजेवाडी, लाडवली, गांधारे पाले, बिरवाडी एमआयडीसी भाग, दादली पूल, पोलादपूर तालुक्यातील माटवण आकले कालवली, केवनाळे, साखर सुतारवाडी या सावित्री नदीलगतच्या सखल भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरुन पूर परिस्थिती निर्माण झालेली होती. टोळ बु.येथे मुंबई गोवा महामार्गावर ६ फूटापेक्षा अधिक पाणी आल्याने महाड कडे जाणारी व येणारी वाहतूक बंद झा-लेली होती. तसेच पाचाड मार्गे जाणाऱ्या रस्त्यावर दरड कोसळल्याने, पोलादपूर मार्गे रस्ता दरड कोसळल्याने व खचल्याने तर म्हसळा, गोरेगाव, आंबेत, चिंभावे मार्गावरही पाणी आल्याने महाड येथे रस्ते मार्गाने पोहोचणे अत्यंत अवघड होते. सावित्री नदीने पात्र ओलांडल्याने व पाण्यास असणाऱ्या प्रचंड वेगामुळे जलमार्गही धोकादायक झालेला होता. त्यामुळे अतिवृष्टी झाल्याने बचाव पथकांना मदत कार्य करण्यास अडथळा निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर रात्रीच्या वेळी हवाई मदत पोहोचविण्यासदेखील अडथळा येत होता. त्यामुळे सूर्योदय झाल्याबरोबर माटवण ता. पोलादपूर, राजेवाडी, बिरवाडी पूरामध्ये अडकलेल्या नागरिकांना हवाई दलाच्या मदतीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले.

या दरम्यान नगरपालिका महाडचे पथक, महेश सानप यांच्या वाईल्डर वेस्ट अँडव्हेंचर वॉटर स्पोर्टस आणि साळुंखे रेस्क्यू ग्रुप यांनी स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने महाडमध्ये बचावकार्य तात्काळ सुरु केले आणि रेस्क्यू ऑपरेशनद्वारे नागरिकांची सुखरुप सुटका करुन त्या सर्वांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत केले. स्थलांतरीत केलेल्या नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, महाड व डॉ. बाबासाहेब आंबडेकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, दगडूशेठ पार्टे विद्यालय, महाड येथे निवास, भोजन व इतर सुविधा उप-लब्ध करुन दिल्या. तर घरात अडकलेल्या नागरिकांसाठी घरोघरी जावून खाण्याचे पदार्थ व पिण्यासाठी पाणी वाटप केले.

महाड तालुक्यातील पूरपरिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी या ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती निवारणची २ पथके, राज्य आपत्ती निवारणची २ पथके, नौदलाची २ पथके, सागरी सीमा सुरक्षा दलाची २ पथके तसेच १२ स्थानिक रेस्क्यू टीममार्फत मदतकार्य सुरु करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाडमध्ये तात्काळ धाव घेत पूरपरिस्थितीची पाहणी करून पूरबाधित नागरिकांचे आणि जनावरांचे स्थलांतरण करून त्यांना युद्धपातळीवर मदत पोहोचविणे, स्थलांतरित केलेल्या नागरिकांसाठी अन्नधान्य, औषध पुरवठा, वैद्यकीय सेवा सुविधा या सारख्या आवश्यक सर्व बाबी उपलब्ध करुन देणे, जनावरांनाही आवश्यक पशुखाद्य आणि पाणी पुरविणे, अतिवृष्टीमुळे खंडित झालेली दूरध्वनी सेवा आणि विद्युत पुरवठा तात्काळ सुरू करणे, अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे करुन त्याची माहिती तात्काळ विमा कंपनीस देणे, इत्यादी प्रकारच्या मदत व बचाव कार्यास सुरुवात केली.

याच दरम्यान महाड तालुक्यातील तळीये गाव दि.२२ जुलैला अतिवृष्टीमुळे दरड कोसळून उद्ध्वस्त झाले. दि.२५जुलै दरडीच्या ढिगाऱ्यातून ५३ मृतदेह बाहेर काढण्यात आले. ५ जण जखमी अवस्थेत सापडले. तर बेपत्ता असलेल्या ३१ जणांचा तीन दिवसांनंतरही शोध सुरुच होता. मात्र तीन दिवसांच्या शोधकार्यानंतर दरडीखाली कोणी जिवंत आढळून येईल, याची खात्री नसल्याने एकूण परिस्थिती पाहता लोकप्रतिनिधी, प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ, टीडीआरएफ पथकांचे मत आणि दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे नातेवाईक या सर्वांशी चर्चाविनिमय करुन मात्र चौथ्या दिवशी रविवार, दि.२५ जुलै रोजी सकाळी बचावकार्य थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या नैसर्गिक आपत्तीत ज्यांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या वारसांना तसेच जखमींना पहिल्या टप्प्यातील नुकसान भरपाईची रक्कम अदा केली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले, आमदार अनिकेत तटकरे व इतर लोकप्रतिनिधी सातत्याने या भागातील मदत व बचावकार्याचा आढावा घेत होते तर जिल्हा प्रशासनातील सर्व यंत्रणा त्यांच्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करीत होते.

या पूरग्रस्त भागातील बचाव व मदतकार्यासंदर्भात संरक्षण मंत्रालयाशी समन्वय ठेवण्यासाठी राज्य शासनाने मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव असिम गुप्ता यांच्यावर नोडल ऑफिसर म्हणून जबाबदारी सोपविली होती. तर राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे स्वत: बचाव व मदकार्यावर लक्ष ठेवून होते.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री सुभाष देसाई, मदत आणि पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, परिवहन मंत्री अनिल परब, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, ऊर्जा मंत्री नितीन राऊत, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मिलिंद नार्वेकर, केंद्रीय मंत्री नारायण राणे, रामदास आठवले, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, प्रवीण दरेकर, मुख्य सचिव सीताराम कुंटे आदि अतिविशिष्ट व्यक्तींनी या भागास भेट देवून तेथील नागरिकांना मानसिक आधार दिला, यावेळी प्रशासनाने या अतिविशिष्ट व्यक्तींच्या पाहणी दौऱ्याचे यशस्वी नियोजनही केले.

पूरग्रस्त व दरडग्रस्त नागरिकांच्या जनजीवनास लवकरात लवकर पूर्वपदावर आणणे, जिल्हा प्रशासनाचे हेच ध्येय होते. आरोग्य, साफसफाई, पाणीपुरवठा इत्यादी अत्यावश्यक बाबींबर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी महाड व पोलादपूर नगरपरिषदेस रक्कम रु.५० लक्ष तर पोलादपूर नगरपरिषदेसाठी रु.१ कोटी इतका निधी मंजूर झाला. त्याप्रमाणे मदत छावण्या सुरू करणे व त्यांना अन्न, पाणी, वैद्यकीय सुविधा देणे आवश्यक होते. तसेच पूरस्थिती आटोक्यात आल्यानंतर व पूराचे पाणी ओसरल्यानंतर रोगराई पसरू नये म्हणून सार्वजनिक ठिकाणचा कचरा हटविणे, मृतदेहांची विल्हेवाट लावणे, पूरग्रस्त क्षेत्रातून पाण्याचा निचरा करणे, यासाठी देखील २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला.या निधीतून संबंधित काम योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आवश्यक ते नियोजन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

या शहराला पुन्हा उभे करण्यासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नाने तातडीने सर्व यंत्रणा २४ तास कार्यान्वित करण्यात आल्या. शहराच्या स्वच्छतेस प्राधान्य देण्यात आले. यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पनवेल महानगरपालिकेकडून तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांकडून स्वच्छता मोहीम तसेच आरोग्य शिबिरे सुरू करण्यासाठी स्वच्छता व वैद्यकीय पथके, विविध साधन सामग्री तसेच अत्याधुनिक यंत्रे पाठविण्यात आली. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी महाड शहर जवळपास तीन ते चार दिवसातच स्वच्छ करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत पूरबाधित नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी विविध कंपन्या, सामाजिक संस्था, स्वयंसेवक यांच्या वतीने महाड येथील पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य, कपडे, पाणी, औषधे इत्यादी जीवनाश्यक वस्तूंचे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले. या प्राप्त झालेल्या वस्तूरुपी मदतीचे वितरण योग्य व गरजू व्यक्तीला, कुटूंबांना होण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ते नियोजन केले.

पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या हद्दीत येणारा वाडा, कुंभरोशी तसेच पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील आंबेनळी घाटात दरडी कोसळून मार्ग बंद झाल्याने प्रतापगड परिसरातील जवळपास ३५ गावांचा संपर्क तुटला होता. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या ठिकाणी तातडीने भेट देवून रस्त्याची पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगून युध्दपातळीवर काम करुन रस्ता मोकळा केला. या संपर्क तुटलेल्या गावातील गावकऱ्यांना रायगड जिल्हा प्रशासनाने जीवनाश्यक वस्तूंची मदत तातडीने पोहोच केली.

अतिवृष्टीमुळे महाड, पोलादपूर तालुक्यामधील बाधित क्षेत्रात मदत व पुनर्वसनाचे काम करण्यासाठी तालुका निहाय अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. झालेल्या नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यासाठी जिल्ह्यातील इतर तालुक्यांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना महाड, पोलादपूर तालुक्यात पाचारण करण्यात आले. त्याचबरोबर संभाव्य साथरोगांचा धोका ओळखून या बाधित क्षेत्रात जिल्हा प्रशासनाकडून रोग निदान शिबिर, औषधोपचार तसेच कोविड-१९ अँटिजेन टेस्टची मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांना प्रति कुटुंब १० किलो गहू, १० किलो तांदूळ, ५ लिटर केरोसीन तसेच ५ किलो तूरडाळ मोफत देण्यात आले. महाड येथील २०घत उपकेंद्राचा वीजपुरवठा कार्यान्वित करण्यासाठी महापारेषणने सलग पाच-सहा दिवस केलेल्या प्रयत्नांमुळे महाड शहराचा विद्युत पुरवठा चक्राकार पध्दतीने सुरु झाला. यामुळे नागरिकांचे जनजीवन सुरळीत होण्यासाठी मोठी मदत झाली.

अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात काही रस्ते वाहून गेले, काही पूल वाहून गेले, काही साकव वाहून गेले तर काही ठिकाणी दरडी कोसळल्यामुळे, रस्ता खचल्यामुळे दळणवळणाचे मुख्य मार्ग बंद झाले होते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करीत ते रस्ते वाहतूकीसाठी खुले केले.

त्याचबरोबर कृषी विभागाच्या विविध योजनांतून पूरग्रस्त शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्याने लाभ देण्याची माहिती जिल्हा प्रशासनाने सर्व गरजू नागरिकांना दिली. तसेच त्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी शेतीच्या झालेल्या नुकसानीची माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले.

या व्यतिरिक्त पूरग्रस्त भागातील जनावरांच्या काळजीसाठी जिल्हा पशुसंवर्धन विभागानेही कंबर कसली. पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या २० पथकांकडून गाय, बैल, बकऱ्या, म्हैस, पाळीव प्राणी, भटकी कुत्री यासारख्या जवळपास २ हजार २०० जनावरांवर उपचार करण्यात आले. दरडग्रस्त व पूरग्रस्त भागातील मुक्या जनावरांच्या चाऱ्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या प्रोत्साहनातून जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचारी संघटनांनी केलेल्या सामूहिक श्रमदानातून अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, ग्रामसेवक,लेखापाल या सर्वांनी २५ टन चारा कापणी करून तो चारा ९ गावातील जनावरांना पुरविला. त्याचप्रमाणे त्यांनी अन्य गावातील जनावरांसाठीही चारा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन केले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून महाड पूरग्रस्तांच्या नुकसान पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण होत असतानाच नागरिकांना सातत्याने ज्यांचे पंचनामे झाले नसतील त्यांनी प्रशास-नाशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचबरोबर जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्याकडून पूरग्रस्तांना मदत करताना सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याच्या साधनांना प्राधान्य द्यावे, असेही आवाहन करण्यात आले. याशिवाय दरड प्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने येथील नागरिकांना दरड प्रवण क्षेत्राची माहिती करुन देणे तसेच त्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण केली. या दरम्यान तळीये गावाच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी प्रशासनाकडून पर्यायी जागेची पाहणी करण्यात आली व गावकऱ्यांच्या संमतीने तळीये खालचीवाडीच्या जवळ तात्पुरत्या पुनर्वसनासाठी आवश्यक कामांना सुरुवात केली. या नागरिकांसाठी टाटा, जेएसडब्ल्यू, नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल या कंपन्यांच्या मदतीने २०ु१०ु१० आकारमानाचे प्रत्येक कुटूंबास एक याप्रमाणे एकूण २४ कंटेनर हाऊस उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच या धक्क्यातून सावरण्यासाठी ज्या नागरिकांना समुपदेशनाची तसेच मानसिक आधाराची गरज असल्याचे ओळखून अशा सर्वांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल भुसारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी समुपदेशनाचे उत्तम काम सुरु केले आहे.

याचबरोबर जिल्हा प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय राखून प्रशासन नागरिकांसाठी करीत असलेल्या उपाययोजनांची माहिती, प्रशासनाकडून नागरिकांना वेळोवळी करण्यात येणारी विविध आवाहने सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांद्वारे,सोशल मीडियाद्वारे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे कार्य जिल्हा माहिती कार्यालयाकडून सातत्याने करण्यात आले.

या आपत्तीला समर्थपणे तोंड देवून जनसामान्यांचे दैनंदिन जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची व विभागांची नावे-


जिल्हाधिकारी निधी चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, सहायक पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक श्री.सचिन गुंजाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती वैशाली माने, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) डॉ.ज्ञानदा फणसे, उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, प्रतिमा पुदलवाड, प्रशाली दिघावकर, अमित शेडगे, दत्तात्रय नवले, डॉ.यशवंत माने, तहसिलदार अण्णाप्पा कन्नशेट्टी, गमन गावित, दिलीप रायण्णावार, इरेश चप्पलवार, सुरेश काशिद, प्र.तहसिलदार समीर देसाई, प्रियांका कांबळे, विजय तळेकर, विशाल दौंडकर, सतिश कदम, विक्रम देशमुख,कविता जाधव, पशुसंवर्धन विभाग उपायुक्त, डॉ.सुभाष म्हस्के, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.बंकट आर्ले, गटविकास अधिकारी दिप्ती देशमुख, सहाय्यक गटविकास अधिकारी डॉ.कैलास चौलकर, कार्यकारी अभियंता, महाड आर.के.बामणे, उप अभियंता, दिनेश पराते, सुनिल बुर्ले, अरुण देवकाते, शिवलिंग उलागडे, नगरपालिका मुख्याधिकारी विराज लबडे, सुरेखा भणगे, किरण मोरे, मनोज उकिर्डे, राहुल इंगळे, माधुरी मडके, संतोष माळी, गणेश शेटे, दयानंद गोरे, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल भुसारे, जिल्हा पोलीस अधीक्षक वायरलेस शाखेचे पोलीस निरीक्षक आर.आर.पाटील, महाड एमआयडीसी सहायक पोलीस निरीक्षक श्री.खाडे, हॅमचे अमोल देशपांडे, दिलीप बापट,सर्व महसूल यंत्रणा, जिल्हा परिषद यंत्रणा, आरोग्य यंत्रणा, पोलीस यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरणचे सर्व अधिकारी, कर्मचारी, अन्न व औषध प्रशासन यंत्रणा, वैधमापन यंत्रणा, नगरपालिका प्रशासन, स्वच्छता कर्मचारी, विविध स्वयंसेवी संस्था.

**(मनोज शिवाजी सानप)**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

# वाकण नाक्यावर ना.नारायण राणे यांचे नागोठणे भाजपच्या वतीने होणार भव्य स्वागत

**दै.रायगड नगरी । वाकण**

राज्यात भाजपच्या वतीने नव्याने केंद्रीय मंत्रिमंडळात सामील झालेल्या केंद्रीय मंत्र्यांनी जनतेचे आशीर्वाद घेऊन कामाला प्रारंभ करण्याचा संकल्प केला आहे. राज्यात जन आशीर्वाद यात्रेचा झंजावत सुरू असतानाच जनतेकडून उत्स्फूर्त स्वागत होतेय. केंद्रीय मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आता उद्योग मंत्री नारायण राणे हे कोकणात भारतीय जनता पक्षाचा जनाधार व पक्षसंघटना मजबूत व बलाढ्य करण्याच्या दृष्टीने सरसावले आहेत. मुंबई नंतर सोमवार दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पाली येथील श्री बल्लाळेश्वराचे ना. नारायण राणे यांनी दर्शन घेतल्या नंतर दक्षिण रायगड जिल्हा जन आशीर्वाद यात्रेचा शुभारंभ होणार आहे. यावेळी जन आशीर्वाद यात्रा पाली कडून पुढे रोहा बाजूकडे जात असताना नागोठणे जवळील वाकण नाका येथे नागोठणे विभाग भारतीय जनता पक्षाच्या वतीने



सकाळी १०.४५ वा. ना.नारायण राणे यांचे भव्य स्वागत होणार आहे. याची जय्यत तयारी भाजपा कार्यकर्त्यांकडून सुरू आहे.

यावेळी या जन आशीर्वाद यात्रेत ना.नारायण राणे यांच्या सह विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर , रायगडचे माजी पालकमंत्री आ.रवींद्र चव्हाण, पेण-सुधागड- रोहा मतदारसंघाचे आ.रवींद्र पाटील ,आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, शिक्षक पदवीधर मतदार संघाचे आ.निरंजन डावखरे,आ.रमेश पाटील, युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अँड. महेश मोहिते,संघटक मंत्री सतीश धारप, उपाध्यक्ष राजेश मापरा, वैकुंठ पाटील,मारुती देवरे, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर तालुका सरचिटणीस आनंद लाड यांच्या सह भाजपचे जिल्ह-ास्तरीय व स्थानिक पातळीवरील नेतेही सहभागी होत असल्याने संपूर्ण वातावरण भाजपामय होणार आहे.या यात्रेद्वारे ग्रामस्थांशी संवाद साधला जाणार आहे. तसेच याच दरम्यान कैंद्री मंत्री ना.नारायण राणे यांच्या कडे असणाऱ्या खात्या संदर्भातील विभागातील जनतेला काही समस्या असल्यास त्यासंदर्भातील निवेदन पत्र माननीय मंत्री महोदयांकडे देण्यात येणार आहे.यासाठी तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेलचा पदग्रहण समारंभ

## सुनिता आठमुठे यांची अध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पन-वेलचा पदग्रहण समारंभ तथास्तु हॉल पनवेल येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने व क्लबच्या सेक्रेटरी ममता राजीवन यांच्या प्रार्थनेने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला गतवर्षाचा अहवाल वाचण्यात आला. इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेलने जिल्हांतर्गत वेगवेगळ्या स्पर्धा व प्रकल्प घेतले होते. तसेच ४ अनाथाश्रमांना उल्का धुरींच्याद्वारे मदत केली याची माहिती दिली. ट्रेजरर सुरूची धोंड यांनी गतवर्षाचा जमाखर्चाचा तपशील दिला. आयएसओ सुरेशा परमारने बर्यालच क्लबशी संपर्क साधून उत्कृष्ठ काम केले. अध्यक्षा सुनिता आडमुळे यांनी पूर्ण क्लबचे भाषणाद्वारे आभार मानले तसेच गेल्या वर्षी क्लब मेंबर्सनी केलेल्या उत्कृष्ठ कामाचे कौतुक केले व त्यांना पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली. अर्चना राव, सुरेखा परमार, अर्चना राजे, डॉ. अंकिता लोखंडे, डॉ. शितल करांडे, डॉ. श्रध्दा ससाणे, अ‍ॅड. स्नेहल वाडकर



अशी आहेत. तसेच यावर्षी पुढील नवीन मेंबर्सचे आगम झाले. त्यामध्ये वर्षा मोटे, सीमा दाहेदार, मुक्ता गुप्ते, सिध्दी लोखंडे, सायली दांडेकर, भूमिका परमार, रचना शेट्ये अशी आहेत. २०२१-२२ ची नवीन कमिटी निवडण्यात आली. त्यामध्ये प्रेसिडेंट सुनिता आडमुठे, सेक्रेटरी ममता राजीवन, व्हा.प्रेसिडेंट साधना धारगळकर, ट्रेजरर लता शहा, आयएसओ सुरेखा परमार, एडिटर कल्पना कोठारी, जॉ.सेक्रेटरी डॉ. हेमा परमार, सीसीसीसी अरूणा आचरेकर, सल्लागार कमिटी :- अँड. स्नेहल वाडकर, मंजू परमार, कल्पना लोखंडे, ज्योती देशमाने असे असून नवीन कमिटी व नवीन मेंबर्सना पीन देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

अध्यक्षा सुनिता आडमुठे यांनी पुढील वर्षीच्या प्रकल्पाची माहिती दिली आणि नंतर व्हाईस प्रेसिडेंट साधना धारगळकर यांनी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पनवेलच्या लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये मूतखड्याच्या उपचारावर अत्याधुनिक-प्रगत तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध झाली आहे. मुतखडा या आजारावर थुलिअम ६० व्हॅट लेझर या मशिनद्वारे विना शस्त्रक्रिया उपचार केले जात आहेत. मुंबईनंतर प्रथमच अशा प्रकारचे लेझर मशिन हे नवी मुंबई, रायगड, कोकणमध्ये प्रथमच लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये आणले आहे. गेल्या ३ महिन्यात ५० पेक्षा जास्त रूग्णांवर उपचार केले गेले आहेत.

लाईफ लाईन हॉस्पिटलचे हे २५ वे वर्षे आहे. मुतखडा उपचाराच्या अत्यावश्यक सेवेसाठी २४ तास उपलब्ध असणारे हॉस्पिटलचे डॉ. अजिंक्य प्रकाश पाटील हे पहिलेच स्थानिक युरोलॉजिस्ट आहेत. थुलिअम लेझर या आधुनिक तंत्रज्ञान विषयी माहिती देताना त्यांनी सांगितले की, या लेझरचे वैशिष्ट्य म्हणजे या लेझरने किडनी स्टोन व प्रोस्टेट यांचे विना शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे उपचार होतात व किडनीमध्ये स्टोन असेल तर तो थुलियम लेझरच्या सहाय्याने फोडता येतो व त्यामुळे पारंपरिक पीसीएनएल म्हणजेच किडनीला छिद्र पाडून त्यातून दुर्बीण टाकून खडा फोडण्याचं



जी शस्त्रक्रिया केली जाते ते आपण टाळू शकतो व किडनीला छिद्र न करता मूत्र मार्गाद्वारे दुर्बीण टाकून त्याच्यातून फायबर लेझरच्याद्वारे किडनी स्टोन फोडता येतो व त्या मुतखड्याचा चुरा होऊन त्याची पावडर करून बाहेर काढली जाते. त्यामुळे शस्त्रक्रियेमध्ये जे किडनीला छिद्र पाडले जाते, ते आपण टाळू शकतो. शिवाय यामध्ये किडनीला छिद्र न केल्यामुळे रक्तस्राव होत नाही तसेच टाके लागत नाहीत, हे विशेष आहे व पेशंटला वेदना न होता हॉस्पिटलमधून २४ तासात घरी डिस्चार्ज करता येते. किडनीमध्ये नळी ठेवण्याची गरज रहात नाही एका दिवसात रूग्ण अगदी घरी जाऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये शस्त्रक्रियेचा जो त्रास असतो तो होत नाही. भूल देखील कमी वेळ द्यायला लागते. खास करून डायबीटीस आणि ब्लड प्रेशरच्या रूग्णामध्ये ही थुलियम लेसरद्वारे किडनी स्टोन फोडण्याची तसेच लेझरद्वारे प्रोस्टेट काढण्याची जी पद्धत आहे ती एक वरदान ठरते. खासकरून डायबेटिस ब्लडप्रेशरच्या रूग्णांमध्ये थुलियम लेझर हे एक वरदान आहे व ते लाईफ लाईन हॉस्पिटलने पनवेलमध्ये प्रथमच आणले आहे. पनवेल तसेच रायगड, नवी मुंबई व कोकणमधील सर्व किडनी स्टोनच्या व प्रोस्टेटच्या रूग्णासाठी अत्यंत गरजेची आधुनित तंत्रज्ञानाची सुविधा पनवेलमध्ये झालेली आहे. युरोलॉजीमध्ये आणखी एक अत्यावश्यक म्हणजे मूत्र नलिकेमध्ये अडकलेला मुतखडा किडनीमध्ये तयार झाल्यानंतर तो लघवीच्या सोबत मूत्रनलिका द्वारे मूत्राशयात सरकतांना मूत्रनलिकेत अडकतो व त्यामुळे रूग्णाला तीव्र वेदना होतात, त्याच वेळेस उलट्या होतात व रूग्ण अक्षरशः लोळतो. अशा वेळेस त्या रूग्णाला ताबडतोब दुर्बिणीने उपचार करून त्याच्या तीव्र वेदनांपासून त्याची ताबडतोब काही मिनिटात सुटका केली जाते असे त्यांनी सांगितले. युरोलॉजीमधील खास करून पुरुषांमधील दोष यामध्ये स्ट्रीक्चर ऑफ यूरेथरा (लघवीच्या मार्गात अडथळा येणे) तसेच जन्मताच मूत्रमार्ग संकुचित किंवा न्यारो असणे शिवाय युरोलॉजीमधील कॅन्सरच्या रुग्णांना देखील याचा फायदा होऊ शकतो जसे मुत्राशयाचा ब्लड कॅन्सर तसेच पुरुषाच्या अंडकोशांचे टेस्टी कलर कॅन्सर, किडनीचा कॅन्सर अशा सर्व कॅन्सर वरील निदान, उपचार व ऑपरेशन्सही या युरॉलॉजी सेंटर्समध्ये केले जातात तसेच युरोलॉजीसाठी लागणार्या सर्व तपासण्या म्हणजे सिटीस्कॅन अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाची थर्टी टू स्लाइसचे सिटीस्कॅन (३ डी) सुविधा की ज्यामुळे कमी रेडीशन (क्ष-किरणे) शरीरावर येतात तसेच एमआरआय आहे, याद्वारे युरोलॉजीसाठी लागणार्याक आधुनिक तपासण्या देखील या सेंटरमध्ये उपलब्ध आहेत, त्यामुळे युरोलॉजीचे युरोलॉजीसाठी लागणार्या सर्व तपासण्या व उपचार एकाच छताखाली केल्या जातात. अधिक माहितीसाठी लाईफ लाईन हॉस्पिटलचे डॉ. अजिंक्य प्रकाश पाटील (मो. ८७७९१९७४८५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# कार्यालयातील चोरीत रोखरकमेसह लॅपटॉप केला लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद कार्यालयात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या चोरीत रोखरकमेसह लॅपटॉप व पेट्रोल परफ्यूमच्या ७६ बाटल्या असा एकूण ७८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना तळोजा फेज-१ परिसरात घडली आहे.

सुफियान मोहम्मद अनिस सय्यद यांचे से.-१० रसबेरी अपार्टमेंट, शॉप नं-५ येथे रियल इस्टेटचे कार्यालय आहे. सदर कार्यालय बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने शटरची पट्टी कापून आत प्रवेश करून आत असलेले ५० हजार रूपये रोख, १० हजारांचा डेल कंपनीचा लॅपटॉप व १८ हजारांचे पेट्रोल परफ्यूमच्या ७६ बाटल्या असा एकूण ७८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# संक्षिप्त...

## ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील हे जन आशीर्वाद यात्रेसाठी आले असता आगरी समाज हॉल मध्ये ओबीसींची जात निहाय जनगणना व्हावी यासाठी भाजपाचे भटके-विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी निवेदन दिले.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओबीसींची जनगणना २०२१ मध्ये होणार असे जाहीर केले होते परंतु कोविड या महामारीमुळे ते चालू करता आले नाही. म्हणूनच यापुढील काळात याच ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी अशी मागणी भाजपाचे भटके-विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी कपिल पाटील यांच्याकडे केली.

यावेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुद्धा यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. व कपिल पाटील यांनी ही मागणी पंतप्रधानांपर्यंत पोहोचू असे आश्वासन दिले.

## पनवेल रेल्वे स्टेशन येथून मोटारसायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरल्याची घटना घडली आहे.

अजय सांगळे यांनी त्यांची मोटारसायकल नेहमीप्रमाणे कामावर जाताना पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात उभी करून ठेवली होती.

ते कामावरून परतले असता त्यांनी त्यांची मोटारसायकल ठेवलेल्या ठिकाणी न आढळल्याने ती चोरीस गेल्याची त्यांच्या लक्षात येताच याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात केली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# शासनाच्या मदतीशिवाय व्यापारी नागरिक पुन्हा नव्याने उभे राहण्याचा प्रयत्न

## महाडच्या प्रलयाला झाला महिना पूर्ण

**दै.रायगड नगरी । महाड**

२१ व २२ जुलै २०२१ च्या महाड तालुक्यावर कोसळलेल्या अस्मानी प्रलयाला आज बरोबर एक महिना पूर्ण झाला आहे. व्यापारी नागरिक आप आपल्यापरिने उदासिन शासनाच्या मदती शिवाय धडपडत का होईनात पुण्हा नव्याने उभे रहाण्याचा प्रयत्न करित आहेत. जणू ती स्वप्ननगरी लाईफ लाईन मुंबई प्रमाणे कौतुक ते महाडकरांच असच काही महाडकरांबद्दल बोलण योग्य ठरणार आहे.



वास्तविक महाडकर गेली ४० वर्ष नैसर्गिक आपत्या झेलत आले आहेत. त्याला वेगवेगळी कारणे असू शकतात म्हणून प्रत्येक प्रलयकारी घटनेला नुसत नैसर्गिक आपत्ती संबोधनून जिवीत आणि वित्तहाणी महाडकरांना खरोखर परवडणारी आहेत का ? हा या सततच्या प्रलयातून मोठा प्रश्नच महाडकरांसमोर उभा टाकला जात आहे.

वर म्हटल्या प्रमाणे उदासिन शासन प्रत्येक दुर्धटने मध्ये २० ते २५ अथवा ५० करोड रुपये खर्च करून महाडकरांचे सतत घेत असणारे बळी आणि शेकडो हजार कोटीची मालमता नुकसान करण्या पेक्षा दुर्घटने नंतर मदतीच्या पेक्षांतून कायम स्वरूपी का ? उपाय योजना करित नाही हा मोठा प्रभ यांतून निर्माण होत आहे. आताच्या दुर्घटनेत तालुक्यांतील तळीये गावावर दरड कोसळून ८७ ग्रामस्थांचा बळी गेला आहे तर शहरांत प्रलयकारी महापुराने व्यापारी नागरिक यांना उदवस्य करून टाकल आहे आज यावर्षाच्या घटनेला एक महिना पूर्ण झाला महाडकरांना फक्त आणि फक्त सामाजिक संघटना दाणशूर भोकाकडून अन्नधान्य जिवनावश्यक सर्व तन्हेची मदत हीच त्यांच्या दुःखावर फुंकर मारणारी महत्वाची ठरली आहे.

गेल दिड ते दोन वर्ष महाडकरांनी काय काय म्हणून सोसायचे हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा टाकला आहे कोरोना महामारी संकट त्याच्या मुळे सततच लॉक डाऊन त्यात अनेकांचे प्राण गमावणे महागडे न परवडणारे उपचार नोकरी व्यवसाय शिक्षणा पासून वंचित महाडकरांसाठी अजून कमी तर काय पुन्हा प्रलयकारी दुर्घटना होय.

म्हणून वर म्हटल्या प्रमाणे गेली ४० वर्ष महाडकर नैसर्गिक आपत्ती झेलत आहेत भोगत आहेत ती फक्त आणि फक्त नाकाम शासन राज्यकर्त्यामुळेच होय ते खोट ठरणार आहे फुटक्या नशीबी महाडकरांना नियतीनेअजून किती दुः ख द्यायचे तर सर्वांचे लाडके कर्तृत्ववान तरुण नेतृत्व माणिकराव जगताप यांच्या अकाली निधना नंतर महाडकरांनी महाप्रलया पेक्षा माणिकराव यांचजाण खुपच मनाला यातना देवून गेले. गेला महिना भर समस्त महाडकर नागरिक व्यापारी कारखानदार नोकरदार आदी माणिकरावांची सतत आठवण काढत आहेत ते एका कारणानी जर माणिकराव आज आमच्यात असते तर पहिल्या चार दिवसांत महाड शहर संपूर्ण सफाई मुक्त तर पुढील आठ दिवसांत दुःखाच्या गतैत सापडलेल्या महाडकर व्यापारी नागरिक ग्रामस्थ यांच्या हातांत नुकसानीचे पंचनामे सोडाच सरकारची तातडीची मदत मिळवून दिली असती एवढ माणिकरावांच कर्तृत्व गुण महाडकरांच्या नशिबातून हिरावून नेल आहे एवढ नक्की.

> **महाड शहर तालुक्याला नैसर्गिक आपत्या तशा नवीन नाहीत. सन १९८४ १९८९ १९९४ आता प्रमाणे बरोबर २५ व २६ जुलै २००५ आणि त्या पेक्षाही महाभयानक आताचा २१ व २२ जुलै २०२१ चा महाप्रलय महाडकरांच्या जिवावर तर बेतलाच परतु संपूर्ण शहराच न भरून निघणारा विनाश करून गेला त्याला नैसर्गिक आपत्ती पेक्षा मानवी चुका आणि उदासिन शासन आणि राज्यकते जास्तच जबाबदार असल्याचे आज आणि वारंवार सिद्ध झाले आहे.**

## स्वखर्चाने नवीन पाईप लाईनचे काम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग 'ड' सभापती सुशिला जगदीश घरत व सामाजिक कार्यकर्ता जगदिश घरत यांनी नवीन पनवेलमधील पीएल ५/५२ बिडींगमध्ये स्वखर्चाने नवीन पाईप लाईनचे काम करून दिले. त्यामुळे तिसऱ्या मजल्यावर पर्यंत पाणी पोहचून रहिवाशांच्या चेहर्योवर आनंद निर्माण झाला.

काही दिवसांपासून पीएल ५।५२ सेक्टर १७ बिडींग मध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली होती. सदरची बाब रहिवाशांनी सभापती सुशिला घरत व समाजसेवक जगदीश घरत यांची भेट घेऊन प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली. यावेळी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले, त्यानुसार दुसऱ्याच दिवशी स्वखर्चाने कामाला सुरुवात करून काम पूर्णत्वास आले. त्यामुळे रहिवाशांना फार मोठा दिलासा मिळाला. त्याबाबद्दल रहिवाशांनी सभापती सुशीला घरत व जगदीश घरत यांचे आभार मानले.

यावेळी प्रभाग १७ अध्यक्ष विजय म्हात्रे, युवा नेते सचिन पाटील, इंद्रायणी असोशियनच्या अध्यक्ष सुभद्रा भोळी, संदीप ना.पाटील, शरद म्हात्रे, अनंत ठाकूर, विशाल जावळे, अनंत जाधव,व महिला वर्ग उपस्थित होता.

## मुलीनी घरादाराची मर्यादा सांभाळून वागावे : ह.भ.प.संकेत महाराज डेरे

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आजच्या विज्ञान आणि फँशनच्या युगात मुलीनी प्रत्येक मुलीने सर्व बाबतीत सजग राहून तसेच एखाद्या गोष्टीचे अति आहारी न जाता आई-वडील व घरादाराची मर्यादा सांभाळून वागणे काळाची गरज असल्याचे वक्तव्य ह.भ.प.संकेतमहाराज डेरे मांजेरी-महाड यांनी रोहे तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली येथे आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी व्यक्त केले.



वै.गु.अलिबागकर महाराज, गोपाळबाबा व धोंडूबाबा यांच्या क्रुपाशिर्वादाने व ह.भ.प.दत्तू महाराज कोलाटकर व ह.भ.प मारूती महाराज कोलाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक पिढ्यांपासून संपन्न झालेल्या या श्रावण मासातील या सहप्ता प्रसंगी आपल्या हरिकिर्तनरुपी सेवेप्रसंगी भाविकांना उद्बोधन करताना संकेतमहाराज बोलत होते. यावेळी संजय जाधव, राजू पवार, भगवान पवार, प्रकाश जाधव, मोतीरामजी पवार, सुजित डांगे, सुतार महाराज, संजय जाधव आदी मांजेरी येथीलजेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तसेच खांब पंचक्रोशीचे क्रुष्णा जाधव, प्रकाश थिटे, ज्ञानेश्वर लोखंडे, राम लोखंडे, तुकाराम महाडिक, नारायण लोखंडे आदी भाविकभक्त उपस्थित होते.

## उरण चारफाटा ते पिरवाडी समुद्र किनारा रस्त्याची गणेशोत्सवापूर्वी दुरुस्ती करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यात सतत पडणाऱ्या पावसामुळे चारफाटा ते पिरवाडी समुद्रकिनारा या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. त्यामुळे पादचारी, पर्यटक आणि येथील वाहनचालक यांना हेलकावे खत मार्गक्रमण कारावे लागत आहे. त्याच प्रमाणे या खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होऊन दुर्घटनाही होण्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे ओएनजीसी प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने गणेशोत्सवापूर्वी सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी म्हातवली ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ रंजना पाटील यांनी ओएनजीसी प्रकल्पाला दिलेल्या निवेदनात केली आहे.

उरण तालुक्यातील म्हातवली व नागाव ग्रामपंचायत हद्दीत केंद्रशासनाचा महत्वपूर्ण विकसनशील असा ओएनजीसी प्रकल्प आहे.या प्रकल्पात मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची रेलचेल सुरू असते. अशा वाहनांच्या वर्दळीमुळे उरण चारफाटा येथून पिरवाडी समुद्र किनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पावसाळ्यात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. सदर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे पिरवाडी समुद्र किनारा व गाव परिसरात ये-जा करणाऱ्या पादचारी नागरीकांच्या अंगावर उडणाऱ्या खड्ड्यांतील घाणीच्या पाण्याचा सामना करावा लागत आहे.

पिरवाडी ये जा करणाऱ्या वाहन चालकांना रस्त्यातील खड्ड्यांतून मार्गक्रमण करताना अपघाताला सामोरे जावे लागत आहे.तसेच पुढील महिन्यात येत्या १० सप्टेंबर २०२१ रोजी गणेशोत्सव हा महत्त्वाचा सणाला प्रारंभ होत आहे. याची गांभीर्याने दखल घेऊन ओएनजीसी प्रकल्प व्यवस्थापनाने उरण चारफाटा येथून पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर जाणाऱ्या रस्त्यांचे दुरुस्तीचे काम गणेशोत्सवा पुर्वी हाती घ्यावे अशी मागणी म्हातवली ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ रंजना पाटील यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने ओएनजीसी प्रशासनाला केली आहे.

## महा.अंनिस म्हसळा शाखेकडून निर्भय वॉकचे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

२० ऑगस्ट २०13 ला पहाटे पुण्यात ओंकारेश्वर पुलावर फिरायला गेलेल्या डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्यावर अज्ञातांनी पाठीमागून गोळ्या घालून खून केला. या घटनेला आज ८ वर्ष पूर्ण होतात. अद्याप खरे मारेकरी व सूत्रधार पकडण्यात शासकीय तपास यंत्रणांना यश आले नाही. तपासातील या दिरंगाई बद्दल चिड, असली तरी गेल्या ८ वर्षात कार्यकर्त्यांनी हातात साधा दगड सुद्धा न घेता संविधानीक व सनदशीर मार्गाने आपला लढा चालू ठेवला. याचे प्रतिबिंब आज राज्यभर निर्भय वॉक करताना दिसून आले.



आज महा अंनिस शाखा म्हसळा याचे वतीने जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली, शाखा अध्यक्ष नवाज नजीर यांच्या नेतृत्वाखाली पाभरे फाटा ते एस.टी स्टँड अशी निर्भय वॉक रॅली काढुन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन केले व नंतर म्हसळा पोलिस स्टेशन सहायक पोलिस निरीक्षक यांचे कडे. मुख्यमंत्री महोदय यांना पाठवायचे निवेदन दिले.

या वेळी म्हसळा शाखा प्रधान सचीव रुपेश गमरे, वै.जाणिवा कार्यवाह प्रमोद भाजी, प्रशिक्षण कार्यवाह संभाजी शिंदे, बुवाबाजी संघर्ष विभागाचे अश्फाक तडवी, जिल्हा अ. नि.प. कार्यवाह प्रा. संजय बेंद्रे, व इतर अनेक कार्यकर्ते, हितचिंतक, उपस्थित होते. आज जिल्हा रायगड शाखा यांचे वतीने जिल्ह्यातील समविचारी संघटना कार्यकर्ते यांचे सोबत ऑनलाईन अभिवादन व निर्धार रॅली चे आयोजन केले आहे.

यात राष्ट्रसेवा दल, युसुफ मेहेर अली सेंटर, कुष्ठरोग निवारण समाती शातिवन, शेतकरी कामगार पक्ष, सर्वहारा जन आंदोलन, साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक समिती, स्त्री मुक्ती संघटना, संभाजी ब्रिगेड, अखिल भारतीय बौद्ध महासंघ, साकव संस्था, भारतीय महिला फेडरेशन , मुलभूत अधिकार संघर्ष समिती, सुरभी स्वयंसेवी संस्था, व स्वदेस फाउंडेशन व इतर अनेक समविचारी संघटना व कार्यकर्ते सहभागी होऊन डॉ. दाभोळकर, पानसरे, कलबुरगी, गौरी लकेश, यांना अभिवादन व विवेकी समाज निर्मिती चा निर्धार व्यक्त करणार आहेत अशी माहिती जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे यांनी दिली.

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पंचामृत वाचन पुष्पचे उद्घाटन संपन्न

### जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी हेमंत पाटील यांच्या पुढाकारातून साकारले हे पंचामृत वाचन पुष्प

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी कार्यालयात पंचामृत वाचन पुष्प नावाच्या पुस्तकांच्या छोटेखानी पुस्तक दालनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते काल दि. २० ऑगस्ट २०२१ रोजी सद्भावना दिनानिमित्त संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के- पाटील, जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक जगन्नाथ वरसोलकर, कर्मचारी संदीप भोईर हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयात सन २०१२ पासून चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या, वाचनाचे प्रचंड वेड असलेल्या श्री.हेमंत हिरालाल पाटील यांच्या पुढाकारातून हे छोटेसे पुस्तकांचे दालन साकारण्यात आले आहे.



सुरुवातीला छोट्याशा पेटीतल्या फक्त सहा पुस्तकांपासून सुरू झालेले हे पंचामृत वाचन पुष्प हे पुस्तकांचे दालन आज २५६ पुस्तकांपर्यंत येऊन पोहोचले आहे.

हेमंत हिरालाल पाटील हे मूळचे धुळे जिल्ह्यातील. शिक्षण नववी उत्तीर्ण. काही अडचणींमुळे पुढील शिक्षण पूर्ण करता आले नाही.

मात्र उपजतच वाचनाची आवड असल्याने श्री.पाटील वेळ मिळेल तसा, प्रसंगी आवर्जून वेळ काढून विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करीत असतात. इतकेच नव्हे तर इतरांनाही पुस्तक वाचनाची सवय लागावी म्हणून स्वतःच सहा पुस्तकांपासून विविध विषयांवरील पुस्तकांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. हेमंत पाटील यांची ही चांगली सवय पाहून जिल्हाधिकारी म्हणून काम केलेले एच.के. जावळे, श्रीमती शितल उगले, विजय सूर्यवंशी, श्रीमती निधी चौधरी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या पंचामृत वाचन पुष्प साठी पुस्तके देऊन श्री.पाटील यांच्या छंदाला पाठबळ दिले आहे.

पाटील यांनी या पुस्तकांची एक नोंदवही ठेवली असून ते शासकीय कर्मचाऱ्यांना ही पुस्तके वाचण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करून देतात. त्याचबरोबर त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही विविध विषयांवरील उपयुक्त पुस्तके संकलन करण्याचा संकल्प केला आहे. त्यादृष्टीने त्यांची वाटचाल सुरू आहे.

## भूमी लँडमार्क प्रॉमिसेस को.सो.ला लागलेल्या भीषण आगीत मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील खांदा वसाहत सिग्नल जवळील भूमी लँडमार्क प्रॉमिसेस को.सो. ला आज सकाळी लागलेल्या भीषण आगीमुळे मोठे नुकसान झाले असले तरी कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही आहे. परंतु यात तिघे जण जखमी झाले आहेत.

येथील ४, ५, ६ मजल्यावर आज सकाळी इमारतीच्या डक्टला शॉर्टसर्किटमुळे अचानकपणे आग लागली. या इमारतीत वेगवेगळ्या मजल्यावर एचडीएफसी बँक, एक्सिस बँक, फिटनेस जिम व गाड्यांचे शोरूम, बांधकाम व्यवसायिकाचे कार्यालय या ठिकाणी असल्याने मोठ्या प्रमाणात येथे वर्दळ होती. आगीच्या धुरामुळे काहींना त्रासही होत होता.

परंतु अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून वेगवेगळ्या कार्यालयात अडकलेल्यांना सुखरूपपणे बाहेर काढले आहे. घटनास्थळी एकूण ६ अग्निशमन दलाचे बंब पोहोचले होते. या आगीत अग्निशमन दलातील एक जवान व दोघे इसम असे किरकोळ जखमी झाले आहेत.